# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३२४ - २३** **दिनांक : - १९/०९/२०२३**

## हायवे रॉबरीचा बनाव करुन तक्रार देवुन मालकाची फसवणुक करणाऱ्या आरोपीतांना अटक वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण शाखेची कामगीरी.

वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दि.०९.०९.२०२३ रोजी रात्रौ ०८.५० वा सुमारास यातील फिर्यादी हे काम करत असलेल्या कंपनीतील खाद्य तेलाची रक्कमेची वसुली करुन ती रक्कम त्यांचे जवळील बॅगेत ठेवुन, त्यांचेकडील मोटारसायकलवरुन मुंबई- गुजरात अहमदाबाद हायवे रोडने जात असतांना फिर्यादी यांचे पाठीमागुन चार अनोळखी इसमांनी त्यांचेकडील दोन मोटार सायकलवरुन फिर्यादी यांचे जवळ येवुन फिर्यादीस शिवीगाळी, धक्काबुक्की करुन फिर्यादीचे जवळील बॅगेत असलेली ३,००,०००/- रुपये रोख रक्कम बॅगेसह जबरीने हिसकावुन चोरी करुन पळुन गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेलया फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ७५५/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे दरम्यान यातील फिर्यादी यांना तपासादरम्यान त्यांचेकडे चौकशी करता ते तपासात काही एक सहकार्य न करता वेळोवेळी खोटी माहीती देत होते. दरम्यान यातील फिर्यादी यांनी मोबाईल फोन बंद केला. त्यामुळे फिर्यादी यांचेवरती संशय बळावल्याने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे माहिती प्राप्त केली असता यातील फिर्यादी हे त्यांचे मुळ गावी राजस्थान येथे गेलेले असल्याचे दिसुन आले. तदुनंतर वरिष्ठांचे परवानगीने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांचे पथक फिर्यादी राहत असलेल्या पत्यावर राजस्थान येथे पाठवुन पथकाने गुन्हयातील फिर्यादी यांना गुन्हयाचे अधिक चौकशीकामी ताब्यात घेवुन वालीव पोलीस ठाण्यात आणुन त्यांचेकडे चौकशी केली असता. चौकशी दरम्यान फिर्यादी यांनी व त्यांचे इतर साथीदार नातेवाईक यांनी आपसात संगणमत करुन कट रचुन जबरी चोरीचा खोटा बनाव केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने यातील आरोपीत नामे १) महेंद्र देवाराम गुर्जर वय- ३५ वर्ष, रा. दिघा, सुभाषनगर, नवी मुंबई २) रामलाल देवाराम गुर्जर वय- २८ रामनगर, डोंबीवली पुर्व जि.ठाणे ३) शैतानराम देवाराम गुर्जर वय- ३८ वर्ष, रा. भानुशाली किराणा दिघा, इंटरपाडा, सुभाषनगर, नवी मुंबई, सर्व मुळ रा. जि.पाली राज्य- राजस्थान यांना अटक करुन त्यांचेकडुन गुन्हयातील अपहार केलेली रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

**----0000----**